



शहर अभियंता कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र. शाअ/ज/६७७४
दिनांक:- २५/०८/२०२६

कार्यालयीन परिपत्रक

विषय:- पुणे महानगरपालिकेच्या पथ विभागातील सर्व कनिष्ठ अभियंता ते कार्यकारी अभियंता तसेच परिमंडळ झोन क्र. १ ते ५ व त्या अंतर्गत सर्व क्षेत्रीय कार्यालयातील पथ विभागाचे कर्मचारी/अधिकारी यांनी चारचाकी ऐवजी दुचाकीवरून नियमित स्थळ पाहणी करणे बंधनकारक करण्याबाबत.

संदर्भ:- कार्यालयीन आदेश जा. क्र. मआ/१२११३ दि.२६/०२/२०२६

संदर्भांकित कार्यालयीन आदेशाच्या अनुषंगाने सर्व उपायुक्त, महापालिका सहाय्यक आयुक्त, मुख्य अभियंता यांनी सकाळच्या सत्रात किमान २ तास (सकाळी ९.४५ ते ११.४५) त्यांचे नियंत्रणाखालील कार्यक्षेत्रात स्वत: संबधित अधिकाऱ्यांसह स्थळ पाहणी करून पाहणीचा दैनंदिन अहवाल विभाग प्रमुखांकडे सादर करणे बाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त कार्यालयीन आदेशाच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिका मुख्य खात्यांतगर्त पथ विभाग, परिमंडळे झोन क्र.१ ते ५ व त्यांच्या अधिनस्त सर्व क्षेत्रीय कार्यालयांतर्गत नवीन रस्ते बनविणे, रस्ते देखभाल व दुरुस्तीची कामे व पूर्ण:डांबरीकरण इ. कामे करणारे सर्व तांत्रिक कर्मचारी व अधिकारी यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील रस्ते, पदपथ, चौक, जल व मलवाहिन्यांची झाकणे, रस्त्यांवरील व पदपथांवरील खड्डे, रस्त्यांची झिज, अतिक्रमणे तसेच इतर पथविषयक समस्या वेळेत निदर्शनास याव्यात या कारणास्तव चारचाकी ऐवजी दुचाकीवरून स्थळ पाहणी करावी.

तसेच उपरोक्त पाहणी दरम्यान निदर्शनास आलेल्या अस्तित्वातील रस्ता/पदपथावरील रहदारीच्या सुरक्षिततेबाबत, रस्त्याची वाहन चालवण्याची गुणवत्ता (Road Riding Quality) आणि त्याबाबत करावयाच्या उपाययोजना या अनुषंगाने अहवाल विभाग प्रमुखांकडे सादर करावा.

सदर कार्यप्रणालीप्रमाणे उपरोक्तनुसार संबधित सर्व कर्मचारी/अधिकारी यांनी तात्काळ अंमलबजावणी करावयाची असून सदर कामात कसूर केल्यास संबधितांवर नियमानुसार कडक कारवाई करण्यात येईल.

(अनिरुद्ध पावसकर)
शहर अभियंता
पुणे महानगरपालिका

प्रत,

१) मुख्य अभियंता, पथ विभाग, पुणे मनपा
२) उपायुक्त परिमंडळ १ ते ५
३) सहाय्यक आयुक्त सर्व क्षेत्रीय कार्यालय